पिपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११०१८. लेखा विभाग

क्रमांकः- लेखा/पेन्शन/३२/कावि/३६२१/२०२०

दिनांकः- ०३/०६/२०२०

प्रति

सर्व विभाग प्रमुख

पिपरी चिंचवड महानगरपालिका

<u>विषय</u>:- **मानसिक विकलांग/शारिरीक दुर्बलता असणाःया अपत्याच्या नावाचा समावेश शासकीय कर्मचा-याच्या निवृत्ती वेतन प्रदान आदेशामध्ये करण्याबाबत..**

२/-महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५०/सेवा४ दिनांक ८/१०/२०१८ मध्ये शासकीय कर्मचारी ज्या वेळी सेवानिवृत्त होईल त्यावेळी त्याचे मूळ निवृत्तीवेतन प्रदान आदेशामध्ये त्याच्या मानसिक विकलांगता/शारिरीक दुर्बलता असणा-या अपत्याच्या नावाचा समावेश करणेत यावा असा निर्णय करणेत आला आहे. सदर शासन निर्णय महानगरपालिकेस लागू आहे

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील सर्व विभाग प्रमुखांना या पत्रान्वये कळविणेत येते की, आपले नियंत्रीत विभागातील सेवानिवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी यांचे निवृत्तवेतन मंजूरीकामी प्रकरण लेखा विभागाकडे सादर करताना नमुना ३ कुटुंबाचा तपशीला मध्ये त्यांचे मानसिक विकलांगता/शारिरीक दुर्बलता अपत्याचा नावाचा समावेश करावा. अशा अपत्यास आपली उपजिवीका करणे शक्य होणार नाही अशा स्वरुपाचे हे अधुपण आहे. त्याचे खात्रीसाठी अपत्याचे मानसिक विकलांगता/शारिरीक दुर्बलते बाबतचे जिल्हा शल्यचिकित्सकाकडील प्रमाणपत्र प्रकरणी सादर करावे. जेणे करुन उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार त्यांचे निवृत्तीवेतन प्रदान आदेशामध्ये सदर मानसिक विकलांग/शारिरीक दुर्बलता असणाःया अपत्याच्या नावाचा समावेश करता येईल.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८.